**SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE**

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART - TWO

**गुरूवार दिनांक, २ फेब्रुवारी, २०१७**

## अधिसूचना

क्रमांक : ०२/२०१७ दिनांक : २-०२-२०१७

**विषय : प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागामध्ये स्वयं-निर्वाही तत्वावर (Self Financing Basis) अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत...**

सर्व संबंधीतांच्या माहिती करीता अधिसुचित करण्यात येते की, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाव्दारे निरंतर शिक्षण अभ्यासक्रमांतर्गत स्वयं-निर्वाही तत्वावर (Self Financing Basis) अल्पकालीन प्रमाणपत्र, पदविका व प्रगत पदविका अभ्यासक्रम सत्र- २०१६-१७ पासून सुरु करण्याबाबतच्या विद्वत परीषदेच्या केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परीषदेने दि. ३०/०७/२०१६ चे सभेने मान्य करुन सदर अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यप्रणाली व्यवस्थापन परीषदेने खालील अटींच्या अधिन राहून मान्य करण्याबाबतचा निर्णय घेतला आहे.

**<u>प्रस्तावना:</u>**

महाराष्ट्र शासनाने उच्च शिक्षणात विद्यापीठ विस्तार सेवा कार्याचे महत्व व त्याची समाजपयोगीता लक्षात घेऊन महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मध्ये कलम ३९ अंतर्गत विद्यापीठामध्ये प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळाची स्थापना करण्याची तरतुद केलेली आहे. त्यानुसार विद्यापीठामध्ये प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळ वर्ष-२००६ पासुन कार्यरत आहे.

अमरावती परिक्षेत्रामध्ये विविध उद्योग सुरु आहेत, उदा. टेक्सटाईल्स पार्क, कृषी उद्योग व अन्न प्रक्रियेवर आधारीत उद्योग अत्यादींचे अनुषंगाने विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास करण्याकरीता भरपूर वाव आहे. मात्र या परिक्षेत्रातील कामगारांना व तरुणांना आवश्यक त्या प्रमाणामध्ये योग्य प्रशिक्षण मिळत नसल्यामुळे आजही कामगार लोक अप्रशिक्षीत असतांनाही विविध उद्योग क्षेत्रामध्ये रोजगार शोधत आहेत व मिळेल त्या उद्योगाकडे वळत आहेत. वरील उद्योगासंदर्भात कुशल मनुष्यबळ पुरविण्यासाठी प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे प्रत्यक्ष उद्योगाला लागणारे कुशल मनुष्यबळ पुरविणे सोपे होईल. विद्यार्थी हा अंतिम वर्षाला असतांना त्याच्या आवडीनुसार आणि सवडीनुसार प्रमाणपत्र अभ्यासक्रम निवडून महाविद्यालयाच्या शैक्षणिक वेळा सोडून पुर्ण करेल, त्यामुळे बहुतांश उद्योगांना कुशल मनुष्य प्राप्त होईल. महाविद्यालयामध्ये प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करतांना महाविद्यालय परिसरातील उपलब्ध असणारे तज्ञ मार्गदर्शक व अस्तित्वात असलेली प्रयोगशाळा याचा विचार तसेच महाविद्यालयाची भौगोलिक परिस्थीतीचा अभ्यास करुनच विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याचे विद्यापीठाच्या प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागामार्फत प्रस्तावित आहे.

प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाव्दारे विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग व विद्यापीठाचे संलग्नित महाविद्यालये व स्वयंसेवी संस्थांमध्ये स्वतंत्रपणे गरजांवर आधारीत रोजगारभिमुख अभ्यासक्रम तयार करण्याचे दृष्टीने सदर अभ्यासक्रमाच्या अभ्यासक्रमीका (syllabus) विषय तज्ञाच्या साह्याने तयार करण्याकरीता प्रौढ, निरंतर शिक्षण मंडळाव्दारे विषय तज्ञांच्या नियुक्त्या करण्यात येतील व प्रस्तृत अभ्यासक्रम सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच प्रौढ, निरंतर शिक्षण मंडळाव्दारे अल्पकालीन स्वयंनिर्वाही तत्वावर विविध अभ्यासक्रम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग व विद्यापीठाचे संलग्नित महाविद्यालये व स्वयंसेवी संस्थाव्दारा चालविल्या जातील, असे प्रस्तावित आहे. सदर प्रमाणपत्राचा कालावधी साधारणतः पुढीलप्रमाणे राहील.

१) प्रमाणपत्र अभ्यासक्रम- ३ महिने

२) पदविका अभ्यासक्रम- ६ महिने व

३) प्रगत पदविका अभ्यासक्रम- १२ महिने.

प्रथम सुरुवातीला काही काळ प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल व त्यानंतर टप्याटप्याने पदविका आणि प्रगत पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल.

**उद्दीष्टे:-**

महाविद्यालयाच्या चार भिंतीमध्ये ज्ञानाचे जे अदानप्रदान चालते त्यातून विद्यार्थ्यांचा बौध्दीक विकास होतो परंतू शारीरीक व बौध्दीक क्षमतांच्या विकासा बरोबरच विद्यार्थ्यांमधील वेगवेगळ्या कौशल्य व कला गुणांना देखील वाव मिळणे आवश्यक असतेच. विद्यार्थ्यांना आपल्या पदवी शिक्षणाबरोबरच आपल्यातील कला कौशल्यांना मजबुत करुन स्वतःला रोजगारक्षम बनवून स्वतःच्या पायावर उभे राहता आले पाहिजे. करीता कला, वाणिज्य, विज्ञान, अभियांत्रिकी, समाजविज्ञान व औषधीनिर्माणशास्त्र शाखेतील पदवी शिक्षण घेता घेताच महाविद्यालयामध्ये अल्पकालीन पदवी, पदविका प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुर्ण करून व्यावसायीक कौशल्य प्रदान करण्याचे हेतूने विद्यार्थ्यांमध्ये रोजगार क्षमता वृध्दींगत करण्यासाठी प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाव्दारे विद्यापीठाच्या प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळाच्या मार्गदर्शनाखाली नवयुवक व युवतींना स्वावलंबी व व्यावसायीक बनविण्यासाठी त्यांना निश्चित स्वरुपाचे कौशल्यपुर्ण शिक्षण देता यावे या हेतूने सदर अभ्यासक्रम सत्र २०१६-१७ पासुन सुरु करण्याचे उद्दीष्ट आहे.

१) विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख तयार करुन त्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणने.
२) विकासात्मक कौशल्ये निर्मितीसाठी विद्यार्थ्यांना प्रेरीत/प्रोत्साहीत करणे.
३) विभागाच्या माध्यमातून शिक्षित समाजाची निर्मिती करणे.
४) विभागाच्या वतीने प्रशिक्षण, अध्यापन व संशोधनाची विद्यार्थ्यांमध्ये क्षमता विकसीत करणे.
५) सामाजिक व शैक्षणिक जीवनकौशल्य विकसीत करणे.
६) विद्यापीठाच्या अंतर्गत असणाऱ्या सर्व शैक्षणिक, संस्थामध्ये सामाजिक विस्तार सेवा कार्याचे जाळे निर्माण करुन त्याव्दारे प्रशिक्षण, अध्यापन, संशोधन आणि विस्तार शिक्षणाला चालना देणे.

**संचालक, प्रौढ,निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाकडे प्रस्ताव सादर करण्याची कार्यप्रणाली:-**

निरंतर शिक्षण अभ्यासक्रमाअंतर्गत चालविण्यात येणारे प्रमाणपत्र अभ्यासक्रम विद्यापीठाचे शेक्षणिक विभाग व विद्यापीठाचे संलग्नित महाविद्यालये व स्वयंसेवी संस्थाना देखील चालविता येतील. सदर अभ्यासक्रमांच्या परीक्षा विभागाच्यावतीने घ्याव्या लागतील. परीक्षांचा निकाल विभागाच्या वतीने लावण्यात येईल तसेच उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यावर विभागाचे संचालक आणि अभ्यासक्रमाचे समन्वयक यांच्या स्वाक्षरी असतील. प्रमाणपत्राचा नमुना सहपत्र क्र. Appendix- I & II अन्वये जोडलेला आहे. निरंतर शिक्षण अभ्यासक्रमाअंतर्गत चालविण्यात येणारे अभ्यासक्रम स्वयंनिर्वाही तत्वावर (Self financing basis) अभ्यासक्रमाच्या प्रस्तावांची तपासणी करण्यासाठी निरंतर शिक्षण समिती मा. कुलगुरुंच्या मार्गदर्शनाखाली गठीत होईल व ती खालीलप्रमाणे असेल.

**निरंतर शिक्षण समीती**

१) संबंधीत विषयाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष / विद्यापीठाचे विभाग प्रमुख / संबंधीत विषयाच्या क्षेत्रातील तज्ञ.
२) संबंधीत विषयांचे दोन विषय तज्ञ.
३) संचालक, प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग सदस्य/सचिव म्हणून काम पाहतील.

**समीतीचे कार्य पुढीलप्रमाणे राहील.**

१) अभ्यासक्रमीका तयार करणे (syllabus)
२) शुल्क निर्धारीत करणे (Fee Structure)
३) प्रस्तावाची तपासणी करुन शिफारस करणे
४) वरील १ ते ३ ह्या शिफारसी मंडळाकडे सादर करणे

प्रमाणपत्र/पदविका अभ्यासक्रम चालविण्यासाठी महाविद्यालये/विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग व स्वयंसेवी संस्था विभागाने तयार केलेल्या विहीत नमुन्यात संचालक, प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभाग यांचेकडे विहीत मुदतीमध्ये प्रस्ताव सादर करतील. विहीत नमुना सहपत्र Appendix-III अन्वये जोडलेला आहे. विभागाकडे प्राप्त झालेल्या अर्जाची छाणनी निरंतर शिक्षण अभ्यासक्रम समीतीकडून करुन घेतल्या नंतर अर्ज प्रस्ताव प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येतील. या मंडळाचे गठण महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मध्ये कलम ३९ (१) नुसार राहील. मंडळाकडून प्रस्तावांना मान्यता प्राप्त झाल्यानंतर प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाचे संचालक हे विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, संलग्नीत महाविद्यालयांना व स्वंयसेवी संस्थांना अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचे मान्यता पत्र पाठवतील.

**शुल्कासंबंधी सविस्तर वर्गीकरण खालीलप्रमाणे प्रस्तावित राहील.**

१) नोंदणी शुल्क (Registration fees)
२) परिक्षा शुल्क (Examination fees)
३) शैक्षणिक शुल्क (Tution fees)

संबंधित विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, संलग्नीत महाविद्यालयांना व स्वयंसेवी संस्था यांना नोंदणी शुल्क व परिक्षा शुल्क हे विद्यापीठ खाती जमा करावे लागेल तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी सादर करावी लागेल.

सदर शैक्षणिक शुल्क अभ्यासक्रम चालविणा-या संबंधीत विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, संलग्नीत महाविद्यालये व स्वयंसेवी संस्था यांचेकडे राहील. या शैक्षणिक शुल्कामधून अभ्यासक्रम शिकविणा-या शिक्षकाचे मानधन व प्रशासकीय खर्च हा संबधित विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, संलग्नीत महाविद्यालयांना व स्वयंसेवी संस्था यांना करावा लागेल.

संचालक, प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागाकडे जमा होणा-या परिक्षा शुल्कामधून सदर अभ्यासक्रमाच्या परिक्षाचे आयोजन विभागाच्यावतीने करण्यात येईल. यामध्ये पर्यवेक्षकांचे मानधन, पेपर काढणे (Paper setting) पेपर मुल्यांकन (Paper valuation) नियमन (Moderation), प्रशासकीय खर्च व इतर आयोजनासाठी किरकोळ खर्च करण्यात येईल.

सदर प्रमाणपत्र अभ्यासक्रम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, संलग्नीत महाविद्यालये व स्वयंसेवी संस्थामध्ये राबवितांना काही गैरप्रकार आढळलयास आवश्यक ती कार्यवाही करण्याचे अधिकार प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळाला राहतील.

अभ्यासक्रमासाठी विषयाशी संबंधित शिक्षकवर्ग, प्रयोगशाळा, कार्यशाळा, वर्गखोल्या, ग्रंथालय व इतर भौतीक सुविधा विनामुल्य उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी विद्यापीठाचे संबंधीत शैक्षणिक विभाग, संलग्नीत महाविद्यालये व स्वयंसेवी संस्था यांची राहील. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, संलग्नीत महाविद्यालये व स्वयंसेवी संस्थाना चालविलेल्या अभ्यासक्रमाचा सविस्तर अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्र संचालंक, प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा विभागामध्ये सादर करावा लागेल. सदर अभ्यासक्रमाचा सविस्तर अहवाल एकत्रितपणे संकलीत करुन विभागाच्यावतीने प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा मंडळाकडे सादर करण्यात येईल.

स्वा/-
(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

APPENDIX-I

# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY

**BOARD OF ADULT & CONTINUING EDUCATION**
**AND**
**EXTENSION SERVICES**

**Awards this certificate to**

**Shri/Smt/Ku. ……………………………………………………………………………..**

**On satisfactory completion of the…………………………………………**

**Certificate course run by this department in collaboration**

**with…………………………………………………………………………...........**

**From……………………………………to…………………………………………**

**He/She passed at the examination**

**in grade…………………………..**

**Course Director** **Director**

**Amravati:**
**Date……………………..** **Code No.………………..**

APPENDIX-II

# SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY
## BOARD OF ADULT & CONTINUING EDUCATION AND EXTENSION SERVICES

## CERTIFICATE

**Awards this certificate to**

**Shri/Smt/Ku. …………………………………………………………………..**

**On satisfactory completion of the……………………………………………**

**Certificate course run by this department in collaboration with…………………………………………………………………………........**

**From…………………………………to……………………………………**

**He/She passed at the examination in grade………………………….**

**Course Co-ordinator** **Principal** **Director**

**Deptt. of Adult, Continuing Education & Extension Services**

**APPENDIX-III**

# Sant Gadge Baba Amravati University

## Department of Adult, Continuing Education & Extension Services

Proposal for conducting Short term/Long term/Advance Diploma Certificate Courses

1. **Basic information about the applicant Departments /College/Institute :**

i) Name of the Department/College/Institute:…………………………………………………………..
ii) Complete Postal Address of Department/College/Institute :………………………………………………… ………………………………………………… …………………………………………………
iii) Phone Number :…………………………………………………
iv) Name of the University Deptt /Principal/Institute. With Full Postal Address :………………………………………………… …………………………………………………

2. **Details of the Course Proposed:**

i) Name of the Course :…………………………………………………………
**a. Certificate**
**b. Diploma**
**c. Advance Diploma**
ii) Target Group :……………………………………………………..
iii) Duration of the Course :……………………………………………………..
iv) Timings :……………………………………………………..
v) Medium of Instruction :……………………………………………………..
vi) No. of candidates to be admitted :……………………………………………………..
vii) Fees to be Charged per students ………………………………………………………

**3. Deatails of the Faculty for Course :**

(i) Whether Department/College/Institute has Any Degree/Diploma related to the Proposed course :- : YES / NO
(ii)Whether the course is prepared by Experts from related field YES/NO
(iii) Information of Course Co-ordinator (To be appointed for the course)

| Name and Address | Qualification | Experience |
|---|---|---|
| | | |

(iv) Information of faculty Members (To be appointed for the course)

| S.No. | Name of the Faculty Member | Qualification | Topies | Full Postal Address |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**4. Details of the Physical Infrastructure to be provided for the course :**

(i) Classroom :……………………………………..
(ii) Library :…………………………………….
(iii) Equipments :…………………………………….
(iv) Any other :…………………………………….

…………………………… ……………………………

Signature of the Co-ordinator
Seal of the Department/Institute/College

Signature & Seal of the
Principal/Head of Department

# अधिसूचना

क्रमांक : ०३/२०१७ दिनांक : २-०२-२०१७

**विषय : संलग्निकरणाबाबत..**

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता अधिसूचित करण्यात येते की, खाली दर्शविलेल्या महाविद्यालयांकरीता, अभ्यासक्रम / विषय / अतिरीक्त तुकडी च्या संलग्निकरण वाढीसंदर्भात नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समित्यांचे अहवाल विद्वत परिषदेच्या पक्षात म.वि.कायदा १९९४ कलम १४(७) अंतर्गत मा.कुलगुरुंनी स्विकृत केल्यानुसार स्तंभ क्र.२ मध्ये दर्शविलेल्या महाविद्यालयास, स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या अभ्यासक्रम / विषय / अतिरीक्त तुकडीस, स्तंभ क्र.४ मध्ये दर्शविलेल्या कालावधीकरीता म.वि.कायदा १९९४ मधील कलम ८३, ८६ व ८७ मध्ये दर्शविलेल्या तरतुदींचे अधिन राहुन संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे.

**TABLE**

| Sr. No. | Name of the College | Subject(s) / Course(s)/ Add. Section(s) | Period of continuation of affiliation |
|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. |
| 1. | Govt. Vidarbha Institute of Science & Humanities, Amravati. | M.A.(Urdu,Hindi)<br><br>M.Sc.(Home-Science)<br><br>M.Phil ( English, Marathi,Urdu, Economics,Geography,Chemistry, Mathematics,Physics,Zoology, Botany,Statistics,Home-Science) | For the session 2014-2015 to 2018-2019. |

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

## NOTIFICATION

No. 04/2017 Date – 02/2/2017

**Subject: Change of Name of University Students**

The applications for change of names of the following students mentioned in column No. 2 have been found in order as provided in para 2(i) of the Ordinance No. 109 vide provisions given in column no. 3 in respect of recording the change of names in the University records.

It is notified that, in accordance with the provisions of para 4 of the said Ordinance hereby grant the change of names of the students as stated in column No. 4 below:

| Sr. No. | Old Name | Provision of Ordinance No. 109 | Changed Name |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1. | Ku.Falguni Dilip Vora | 2(i)(a) | Sau.Falguni Amit Shah |
| 2. | Ku.Rajkanya Dattatraya Belkhede | 2(i)(a) | Sau.Rajkanya Dinkar Adole |
| 3. | Ku.Archana Madan Dusad | 2(i)(a) | Sau.Archana Pramod Khandelwal |
| 4. | Ku.Savita Rameshwar Ganekar | 2(i)(a) | Sau.Savita Suhas Dhole |
| 5. | Ku.Mousami Vilinikaran Jabade | 2(i)(a) | Sau.Mousami Prashant Turuk |
| 6. | Ku.Kiran Nilkanthrao Nirmal | 2(i)(a) | Sau.Kiran Anil Ghongade |
| 7. | Ku.Chandni Rajendra Tomar | 2(i)(a) | Roshni Rajendra Tomar |
| 8. | Prajwal Ravindra Bairagi | 2(i)(f) | Prajwal SunitaVaishnava. |
| 9. | Tinukumar Shankarlalji Chandak | 2(i)(f) | Aditya Shankarlalji Chandak |

Sd/-
(Dr. J.D.Wadate)
Controller of Exams.
Sant Gadge Baba Amravati University

*****